# ठाणे महानगरपालिका, ठाणे

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २५/०२/२०१५

**मा. सर्वसाधारण सभा इतिवृत्तांत**
**सभा क्रमांक ३३ दिनांक २०/०२/२०१५**
**सभा सूचना क्रमांक १० दिनांक ११/०२/२०१५**
**सभा क्रमांक ०२ दिनांक २०/०२/२०१५**

ठाणे महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा दिनांक २०/०२/२०१५ रोजी आयोजित करण्यांत आली होती. सदर सभा तहकूब झाल्याने सदरची सभा बुधवार दिनांक २५/०२/२०१५ रोजी सकाळी ११.३० वाजता ठाणे महानगरपालिकेच्या " भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात " सभा सूचना क्रमांक १० दिनांक ११/०२/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्याकरिता आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. महापौर श्री. संजय भाऊराव मोरे हे उपस्थित होते.

**१) श्री. संजय भाऊराव मोरे - महापौर**
**२) श्री. राजेंद्र रमेश साप्ते - उप महापौर**

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | नरेश रतन मणेरा | ४ | डुंबरे मनोहर जयसिंग |
| ५ | मुकेश मधुकर मोकाशी | ६ | उज्वला रामचंद्र फडतरे |
| ७ | मिनाक्षी राजेंद्र शिंदे | ८ | पुर्णेकर जयनाथ यशवंत |
| ९ | स्नेहा अंकुश पाटील | १० | मधुकर रामचंद्र पावशे |
| ११ | उषा संजय भोईर | १२ | भोईर संजय देवराम |
| १३ | आशादेवी शेरबहादूर सिंह | १४ | हरिश्चंद्र श्रीपत पाटील |
| १५ | चव्हाण तेजस्विनी किरण | १६ | चव्हाण सुधाकर वामन |
| १७ | वाव्हळ सुभाष सिताराम | १८ | प्राजक्ता प्रदिप खाडे |
| १९ | संभाजी धोंडिराम पंडीत | २० | सुशिला संकटाप्रसाद यादव |
| २१ | विलास चंदू कांबळे | २२ | चिंदरकर कांचन विजय |
| २३ | राधा फत्तेबहादूर सिंह | २४ | जगदाळे हनुमंत ज्ञानु |
| २५ | जाधवर राधाबाई सुभाष | २६ | पालांडे दशरथ बाबुराव |
| २७ | पाटील वर्षा वसंत | २८ | पाटील कल्पना हरिश्चंद्र |
| २९ | भोईर विमल अर्जून | ३० | डिसोजा लॉरेन्स साल्वाडोर |
| ३१ | पांडे संजय श्रीनाथ | ३२ | गौरी अनिता सुनील |

-महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

| | | | |
|---|---|---|---|
| ३३ | पाटील शारदा विजय | ३४ | पाटील उमेश काशिनाथ |
| ३५ | देसाई सुहास सुर्यकांत | ३६ | पाटील रत्नप्रभा लक्ष्मण |
| ३७ | एगडे रामचंद्र हरी | ३८ | महेश्वरी संजय तरे |
| ३९ | नंदिनी राजन विचारे | ४० | नंदा कृष्णा पाटील |
| ४१ | वडवले संतोष वसंत | ४२ | मंदार प्रमोद विचारे |
| ४३ | वैती अशोक बारकू | ४४ | कणसे निर्मला शरद |
| ४५ | तायडे रामभाऊ महादेव | ४६ | बोरीटकर प्रभा अशोक |
| ४७ | आशा बाबासाहेब कांबळे | ४८ | भोईर एकता एकनाथ |
| ४९ | शान मनप्रीत गुरमकसिंग | ५० | जितेंद्र प्रभाकर वाघ |
| ५१ | संगिता माणिक पाटील | ५२ | शिंदे मनोज तुकाराम |
| ५३ | घाडीगांवकर संजय पांडुरंग | ५४ | काशिराम गोविंद राऊत |
| ५५ | खताळ विशाखा मधुकर | ५६ | मोरे संध्या सुनिल |
| ५७ | फाटक रविंद्र सदानंद | ५८ | जानकर योगेश तातोबा |
| ५९ | वेतकर दिपक विजय | ६० | जगताप अश्विनी अशोक |
| ६१ | म्हस्के नरेश गणपत | ६२ | संखे मिनल मुकूंद |
| ६३ | मोरे रुचिता राजेश | ६४ | हिराकांत बेंडू फर्डे |
| ६५ | सोनार सारिका संजय | ६६ | नारायण शंकर पवार |
| ६७ | नजीब सुलेमान मुल्ला | ६८ | कोकाटे सुधीर विष्णु |
| ६९ | साळवी अपर्णा मिलींद | ७० | वहिदा मुस्तफा खान |
| ७१ | पाटील मनाली मिलींद | ७२ | साळवी मनोहर रामा |
| ७३ | केणी प्रमिला मुकूंद | ७४ | पाटील मिलींद भारत |
| ७५ | हंडोरे मेघना सुनिल | ७६ | केणी मुकूंद बाळू |
| ७७ | लोखंडे सुहासिनी सुनिल | ७८ | महदिप भुपेंद्रसिंह बिस्ट |
| ७९ | संजय संतू वाघुले | ८० | सामंत विलास शिवराम |
| ८१ | रेखा भालचंद्र पाटील | ८२ | पाटील मालती रमाकांत |
| ८३ | नाईक राजश्री सुनिल | ८४ | टिकमानी लक्ष्मण (लच्छू) |
| ८५ | राजेश भालचंद्र गवारी | ८६ | राजे गिरीश अनंत |
| ८७ | यादव रिटा राजनाथ | ८८ | ठाकूर अक्षय अनंत |
| ८९ | कुरेशी साजिया आई | ९० | काकडे बालाजी दगडू |

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| ९१ | असिया यासिन कुरेशी | ९२ | कुरेशी यासीन अय्युब |
| ९३ | विश्वनाथ  भगत | ९४ | गोटे सिंधू कुंदन |
| ९५ | भगत सुधीर रामचंद्र | ९६ | पाटील रेश्मा रमेश |
| ९७ | किणे राजन नारायण | ९८ | पठाण अशरफ उस्तान |
| ९९ | मिर्झा जमेला तबस्सूम इनायत बेग | १०० | हफिजा नसीरुद्दीन नाईक |
| १०१ | अन्सारी साजिर मो युसुफ | १०२ | डोंगरे सिराज महम्मद अली |
| १०३ | आशरीन इब्राहीम राऊत | १०४ | अन्सारी साजिया परवीन सरफराज |

**-: रजा सदस्य :-**

१) इंदिसे रेखाबाई मिनानाथ

**-: गैरहजर सदस्य :-**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आरज प्रगती भारत | २ | मढवी बिंदू महेंद्र |
| ३ | राजकुमार रामनयन यादव | ४ | सरैय्या अमित जयसिंग |
| ५ | सरनाईक परिषा प्रताप | ६ | सरनाईक विहंग प्रताप |
| ७ | चव्हाण विक्रांत भिमसेन | ८ | लासे विजया मनोज |
| ९ | मिलिंद माधव पाटणकर | १० | फाटक जयश्री रविंद्र |
| ११ | भोसले नम्रता दिपक | १२ | पाटील सुजाता भास्कर |
| १३ | वाघ पुजा गणेश | १४ | महेश सुरेश वाघ |
| १५ | महेश जगन्नाथ साळवी | १६ | मनिषा महेश साळवी |
| १७ | अनिता अरुण बिर्जे | १८ | भरत अभिमन्यु चव्हाण |
| १९ | पाटील अवंतिका शशिकांत | २० | कळंबे मंगल चंद्रकांत |
| २१ | खान मिराज नईम | २२ | हसिना अब्दुल अजिज शेख |
| २३ | हिरा सिताराम पाटील | २४ | पाटील शैलेश मनोहर |
| २५ | मुंडे सुनिता गणेश | | |

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

**मा.महापौर सो. छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळयास पुष्पहार अर्पण करतात.**
**तद्नंतर सभा दुपारी ठिक १२.४० वाजता सुरु झाली.**
**मा. महापालिका सचिव सभेची सूचना वाचून दाखवितात.**

**मा. महापालिका सचिव :-**

मा.महापौर महोदय, आजच्या सभेसमोर सन्मा. सदस्य, श्रीम. रेखाताई इंदिसे यांचा रजा अर्ज प्राप्त झाला आहे.

**श्री. गिरीश राजे :-**

सन्मा.महापौर महोदय, आजच्या सभेसाठी शिवसेनेचे माजी नगरसेवक प्रकाश राऊत साहेब यांचे शनिवारी दु:खद निधन झाले आहे. त्यांच्या दु:खद निधना निमित्त मी अर्धा तास सभा तहकूबीचा प्रस्ताव दिला आहे.

**श्री. संजय भोईर :-**

मा.महापौर महोदय, गोविंदराव पानसरे यांची हत्या होऊन निधन झालेले आहे. आपणांस या ठिकाणी विनंती आहे की, आपण ही सभा पूर्ण वेळ तहकूब करण्यांत यावी.

**मा.महापौर सो. :-**

सन्मा. सभागृहनेत्यांचा दुखवटा ठराव सुध्दा आहे. तसेच दोन सभा तहकूबी आहेत त्या वाचा.

**मा.महापालिका सचिव :-**

मा.महापौर महोदय, सुचक सन्मा. सदस्य, श्री. संजय भोईर व अनुमोदक सन्मा. सदस्य, श्री. मनोज शिंदे यांची सभा तहकूबी प्राप्त झाली आहे. मा. महापौर साहेबांच्या परवानगी मी त्याचे वाचन करतोय.

दिनांक २४/०२/२०१५

प्रति,
मा.महापौर सो.
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
यांसी,
स.न.वि.वि.

**विषय :- सभा तहकुबीची सुचना.**

**महोदय,**

बुधवार दिनांक २५/०२/२०१५ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेमध्ये पुरोगामी चळवळीतील भीष्माचार्य, कामगार चळवळीतील ज्येष्ठ नेते, भाकपचे कॉ.गोविंदराव पंडरीनाथ पानसरे यांचे निधन झाल्याबद्दल आम्ही सभा तहकुबीची सुचना मांडत आहोत.

मागील चार दिवसांपासून मृत्यूशी सुरु असलेली झुंज अखेर शुक्रवारी दिनांक २० फेब्रुवारी २०१५ रोजी १०.४५ वा. संपली. ते ८२ वर्षाचे होते. आयुष्यभर विवेकाने विचारांची लढाई लढणारा लढवय्या काळाच्या पडदयाआड गेल्याने पुरोगामी चळवळीतून तीव्र शोक व्यक्त केला जात आहे.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

डाव्या चळवळीतील ज्येष्ठनेते, कष्टक-यांचे नेते असलेले कॉ.गोविंदराव पानसरे यांच्यावरील गोळीबाराच्या घटनेने अवघा महाराष्ट्र हादरला. कोल्हापूरातील सागरमाळ, तोरणनगर येथील आयडियल सोसायटीत पानसरे कुटूंब राहत होते. कॉ.गोविंद पानसरे पत्नी उमासह सकाळी फिरायला जात होते. हुतात्मा स्मारक चौक येथे त्यांनी अल्पोपहार घेतला. त्यानंतर ९.३० वा. च्या सुमारास ते घराच्यासमोर आले असतांना दुचाकीवरुन आलेल्या दोन अज्ञात तरुणंनी अगदी जवळून पानसरे दांपत्यांवर गोळया झाडल्या. कॉ.पानसरे यांना तीन गोळया लागल्या होत्या. तर उमा पानसरे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. गोळीबारानंतर पुढील उपचारासाठी कॉ.गोविंद पानसरे यांना मुंबईतील ब्रीचकॅण्डी रुग्णालयात हलविण्यांत आले. उपचार सुरु असतानाच त्यांची प्राणज्योत मावळली.

कॉ.गोविंद पानसरे मुळचे अहमदनगर जिल्हयातील श्रीरामपूर तालुक्यातील कोल्हार गांवचे, गरीब शेतकरी कुटूंबात त्यांचा जन्म झाला होता. कॉ.गोविंदराव पानसरे १९५२ पासून भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सभासद बनले. कोल्हापूरात आल्यापासून तर कम्युनिस्ट विचार रुजविण्यासाठी त्यांनी सतत्याने प्रत्यत्न केले. त्यांनी आपल्या प्रखर बुध्दीमत्तेने आणि कडव्या संघर्षाच्या जोरावर सार्वजनिक जीवनात आपले अढळस्थान निर्माण केले. कोल्हापूरच्या कम्युनिस्ट पक्षाचे आकारमान जरी छोटे असले तरी त्यातही सामाजिक भान असणा-या निष्ठावंत लढाऊ कार्यकर्त्यांची एक फळी गेल्या ४० वर्षाच्या सार्वजनिक जीवनामध्ये या ना त्या लढयाच्या निमित्ताने लढताना दिसले, याचे संपूर्ण श्रेय पानसरे यांना दयावे लागेल. अशा कार्यकर्त्यांना घडवण्यासाठी ते भाषणाचे वर्ग घेत होते. मार्क्सवादाचे मोफत क्लास चालवित होते. जागतिक घडामोडी आणि राष्ट्रीय घडामोडी यांची तरुण कार्यकर्त्यांना ओळख करुन देण्यासाठी त्यांनी हजारो व्याख्याने दिली. विशेषतः सामाजिक अन्याय आणि अंधश्रध्दा याबाबतीत संघर्षाने पेटून उठून या प्रकारांना आळा घालण्यांत ते अग्रेसर राहिले.

कॉ. अविनाश पानसरे या पित्याप्रमाणे अढाऊ बाणा असलेल्या युवा नेत्याचे अकाली निधन झाल्यानंतर कोल्हापूरातील डावी पुरोगामी चळवळच हादरुन गेली. कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांच्या मृत्यूने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. आयुष्यभर विवेकाने विचारांची लढाई लढणारे काळाच्या पडदयाआड गेल्याने पुरोगामी चळवळीचे मोठे नुकसान झाले आहे. कॉ.गोविंदराव पानसरे यांच्या निधनाने डाव्या चळवळीतील भीष्माचार्य हरपले असून त्यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र नव्हेतर संपूर्ण भारत देशात शोककळा पसरली आहे. कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांचे आत्म्यास चिरशांती लाभो याकरिता आम्ही ईश्वरचरणी प्रार्थना करीत असून त्यांच्या कुटूंबास हे दु:ख सहन करण्याची ईश्वर त्यांना ताकद देवो अशी आम्ही प्रार्थना करीत आहोत. सदर दु:खवटा ठराव आगामी सर्वसाधारण सभेत घेऊन त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करुन ही सभा तहकुबी सुचना मान्य करुन ही सभा तहकूब करण्यांत यावी ही विनंती.

सही/-
सुचक :- श्री. संजय भोईर

सही /-
अनुमोदक :- श्री. मनोज शिंदे

**मा. महापालिका सचिव :-**

मा.महापौर महोदय, यांनतर सुचक सन्मा.सदस्य श्री. गिरीश राजे आणि अनुमोदर सन्मा सदस्य, श्री. दशरथ पालांडे यांची सभा तहकूबी प्राप्त झाली आहे ती मी वाचून दाखवतो.

दिनांक २४/०२/२०१५

प्रति,
मा.महापौर सो.
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
यांसी,
सस्नेह जय महाराष्ट्र.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

**विषय** :- दिनांक २५/०२/२०१५ रोजीच्या महासभेत माजी सन्मा.सदस्य श्री. प्रकाश हरिश्चंद्र राऊत यांचे दु:खद निधनाचा दुखवटा ठराव घेऊन अर्धा तास सभा तहकूब करणेबाबत.

महोदय,

ठाणे महानगरपालिकेची मा.महासभा बुधवार दिनांक २५/०२/२०१५ रोजी बोलविण्यांत आली आहे. सदर सभेमध्ये खालीलप्रमाणे दुखवटा ठराव घेऊन अर्धा तास सभा तहकूब करण्यांत यावी ही विनंती.

**दुखवटा ठराव**

ठाणे महानगरपालिकेचे माजी सन्मा. नगरसवेक श्री. प्रकाश हरिश्चंद्र राऊत यांचे शनिवार दि. २१ फेब्रुवारी २०१५ रोजी सकाळी ११.३० वा. हृदयविकाराच्या झटक्याने दु:खद निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले, मुली, स्नुषा, नातवंडे व जावई असा परिवार आहे.

कै. प्रकाश हरिश्चंद्र राऊत हे ठाणे नगरपरिषदेच्या १९७४ साली झालेल्या निवडणूकीत प्रथमच शिवसेनेचे नगरसेवक म्हणून वॉर्ड क्र. ५९ मधून निवडून आले होते.

त्यानंतर सतत नगरसेवक असलेले कै.प्रकाश हरिश्चंद्र राऊत ठाणे महानगरपालिकेच्या १९८६ सालच्या निवडणूकीत प्रथम नगरसेवक म्हणून निवडून आले. १९८८ सालच्या महापौर पदाच्या निवडणूकीत ते शिवसेना पक्षातर्फे महापौर पदासाठी उमेदवार होते. परंतु ते एका मताच्या फरकामुळे निवडून येऊ शकले नाहीत. २००७ सालच्या महापालिकेच्या निवडणूकीत ते परत एकदा नगरसेवक म्हणून निवडून आले.

१९७४ ते १९८१ नगरपरिषदेचे नगरसेवक. १९८६ ते २०१२ महानगरपालिकेचे नगरसेवक तसेच महानगरपालिकेत आरोग्य समिती सभापती, स्थायी समिती सदस्य म्हणून त्यांनी कार्य केले आहे.

शिवसेना पक्षाच्या प्रत्येक कार्यक्रमात, तसेच ठाणे पूर्वेच्या विकासात त्यांचा सिंहाचा वाटा होता.

कै. प्रकाश हरिश्चंद्र राऊन यांचे निधनामुळे त्यांच्या कुटूंबियांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे हे दु:ख सहन करण्याची ताकद परमेश्वर त्यांच्या कुटूंबियांस देवो व त्यांच्या आत्म्यास शांती लाभो अशी परमेश्वर चारणी प्रार्थना करुन त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करावी. तसेच ही महासभा अर्धा तास तहकूब करावी ही विनंती.

सही/-
सुचक :- श्री. गिरीश अनंत राजे

सही /-
अनुमोदक :- श्री. दशरथ पालांडे

**मा.महापालिका सचिव :-**

मा.महापौर महोदय, सुचक सन्मा.सदस्य,श्री. नरेश म्हस्के व अनुमोदक सन्मा. सदस्य, विरोधी पक्षनेते श्री. हणमंत जगदाळे यांच्याकडून देखिल कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांचा दुखवटा ठराव प्राप्त झाला आहे.

दिनांक :- २१ फेब्रुवारी, २०१५.

प्रति,
**मा.महापौर,**
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

यांसी, सस्नेह जय महाराष्ट्र !

**विषय :- <u>दु:खवटा ठराव</u>.**

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

महोदय,

पुरोगामी चळवळीतील भीष्माचार्य, कामगार चळवळीतील ज्येष्ठ नेते, भाकपचे सरचिटणीस कॉ.गोविंदराव पंढरीनाथ पानसरे यांचे मुंबईतील ब्रीच कॅण्डी रुग्णालयात रात्री उशिरा निधन झाले. ते ८२ वर्षांचे होते. मागील चार दिवसांपासून मृत्यूशी सुरु असलेली झुंज अखेर शुक्रवार दिनांक २० फेब्रुवारी २०१५ रोजी १०.४५ वा संपली. आयुष्यभर विवेकाने विचारांची लढाई लढणारा लढवय्या काळाच्या पडद्याआड गेल्याने पुरागामी चळवळीतून तीव्र शोक व्यक्त केला जात आहे.

डाव्या चळवळीतील ज्येष्ठनेते, कष्टक-यांचे नेते असलेले कॉ.गोविंदराव पानसरे यांच्यावरील गोळीबाराच्या घटनेने अवघा महाराष्ट्र हादरला. कोल्हापूरातील सागरमाळ, तोरणनगर येथील आयडियल सोसायटीत पानसरे कुटूंब राहत होते. कॉ.गोविंद पानसरे पत्नी उमासह सकाळी फिरायला जात होते. हुतात्मा स्मारक चौक येथे त्यानी अल्पोपहार घेतला. त्यानंतर ९.३० वा.च्या सुमारास ते घराच्या समोर आले असतांना दुचाकीवरुन आलेल्या दोन अज्ञात तरुणांनी अगदी जवळून पानसरे दांपत्यावर गोळया झाडल्या. कॉ.पानसरे यांना तीन गोळया लागल्या होत्या. तर उमा पानसरे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. उमा पानसरे यांची प्रकृती स्थिर आहे. गोळीबारानंतर त्यांच्यावर कोल्हापूरच्या ॲस्टरआधार रुग्णालयात उपचार सुरु होते. त्यांच्यावर तीन शस्त्रक्रीया करण्यांत आल्या. त्यानंतर त्यांची प्रकृती गंभीर परंतू स्थिर असल्याचे डॉक्टरांनी जाहीर केले होते. शुक्रवारी दुपारी पुढील उपचारासाठी कॉ. गोविंद पानसरे यांना मुंबईतील ब्रीच कॅण्ड रुग्णालयात हलविण्यात आले. उपचार सुरु असतानाच त्यांची प्राणज्योत मावळली.

कॉ.गोविद पानसरे मुळचे अहमदनगर जिल्हयातील श्रीरामपूर तालुक्यातील कोल्हार गावचे, गरीब शेतकरी कुटूंबात त्यांचा जन्म झाला. पानसरे यांचे वडील पंढरीनाथ हे शेतकरी आणि आई हरणाबाई शेतमजूर. गरिबीशी झुंज देत गोविंदरावांनी कोल्हारमध्ये सातवीपर्यंत शिक्षण घेतले. सातवीनंतर पुढील शिक्षणासाठी ते राहुरीला आले. तेथे पत्की गुरुजी चालवित असलेल्या बोर्डींगमध्ये त्यांनी शिक्षण घेतले. दहावींनंतर पत्की गुरुजींना कोल्हापुरला जावे लागले. शिक्षण घेण्याची आर्थिक कुवत नसलेल्या या तरुणाला मूळच्या कोल्हापूरच्या पण स्वातंत्र्यपुर्व काळात गोविंद दामोदर पत्की या स्वातंत्र्यसैनिकाने हात दिला आणि शिक्षणासाठी वयाच्या १५ व्या वर्षी पत्कींच्या मदतीने पानसरे कोल्हापूरात आले. कोल्हापूरात त्यांनी राजाराम कॉलेजमधून कला शाखेचे शिक्षण घेतले. गोविंदरावांना बोर्डींगमध्ये यायला उशीर झाल्यामुळे त्यांना तेथे प्रवेश मिळाला नाही. त्यानंतर त्यांनी कधी भोसले गुरुजींच्या घरी जेवण तर कधी मित्राकडे मुक्काम. तलावावर स्नान आणि बिंदू चौकातील महात्माफुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाच्या पायथ्याशी बसून अभ्यास असा खडतर संघर्ष त्यांनी केला. कम्युनिस्टांनी चालवलेल्या पुस्ताकाच्या दुकानात काम, पेपर टाकणे अशी कामे त्यांनी केली. त्यांचा अखंड संघर्ष सुरुच होता. शिक्षणाची धडपड होती. त्यांनी रात्रपाळीत महापालिकेच्या जकात विभागात काम आणि दिवसा कॉलेज करीत बी.ए.ची पदवी संपादन केली.

कोल्हापूरातील याच दिवसात त्यांचा कम्युनिस्ट विचारसरणीशी संपर्क आला. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर त्यांनी आवाज उठविला. शाहु महाविद्यालयातून एलएलबी केले. पालिकेच्या शाळेत शिक्षकाची नोकरी केली. तदनंतर वकीली करतांना कष्टकरी, गरीब कामगार यांची कामे ते करीत असत. त्यांनी नेहमीच कामगारांचे प्रश्न सोडविण्यांसाठी प्राधान्य दिले. गोविंदरावांनी आयुष्यभर मोर्चे, आंदोलने, चळवळी यासाठी काम केले. महाराष्ट्र आणि गोवा मुक्ती आंदोलनात ते सक्रीय होते. कामगारांच्या १८ संघटना ते चालवत होते.

कॉ.गोविंदराव पानसेरे १९५२ पासून भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सभासद बनले. कोल्हापुरात आल्यापासून तर कम्युनिस्ट विचार रुजविण्यांसाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांनी आपल्या प्रखर बुध्दिमत्तेने, उत्तुंग ध्येयवादाने, प्रामाणिक तत्वज्ञानाने आणि कडव्या संघर्षांच्या जोरावर सार्वजनिक जीवनात आपले अढळस्थान निर्माण केले. कोल्हापूरच्या कम्युनिस्ट पक्षाचे आकारमान जरी छोटे असले तरी त्यातही सामाजिक भान असणा-या निष्ठावंत लढाऊ कार्यकर्त्यांची एक फळी गेल्या ४० वर्षांच्या सार्वजनिक जीवनामध्ये या ना त्या लढयाच्या निमित्ताने लढताना दिसले, याचे संपूर्ण श्रेय पानसरे याना द्यावे लागेल. अशा कार्यकर्त्यांना घडवण्यासाठी ते भाषणाचे वर्ग घेत होते. मार्क्सवादाचे मोफत क्लास चालवित

होते. जागतिक घडामोडी आणि राष्ट्रीय घडामोडी यांची तरुण कार्यकर्त्यांना ओळख करुन देण्यासाठी त्यांनी हजारो व्याख्याने दिली. पक्ष हाच जणू त्यांचा संसार होता आणि कार्यकर्ते ही त्यांची मुले म्हणूनच "रेड फलॅग बिल्डींग" मध्ये वावरत होती. आपल्या कार्यकर्त्यांची सुख-दुःखे त्यांच्या अडचणी यामध्ये धावून जाणा-यात पानसरेंचा पहिला नंबर असायचा. यामुळे "अण्णा" या नावाने वावरणारे हे व्यक्तिमत्व पक्षाच्या कार्यकर्त्यांना कधी आपल्या कुटूंबापासून दूरचे वाटलेच नाही. कोल्हापूरात तर जिथे अन्याय तिथे पानसरे हे समीकरणच जणू ठरलेले ! विशेषतः सामाजिक अन्याय आणि अंधश्रध्दा यांनी जिथे जिथे डोके वर काढण्याचा प्रयत्न केला तिथे तिथे संघर्षांने पेटून उठून या प्रकारांना जमिनीत गाडण्यात ते अग्रेसर राहिले. वर्ण व्यवस्थेबाबत शंकराचार्यांनी केलेल्या विधानाचा निषेध असो अथवा पावसासाठी प्रार्थना करण्यासाठी राज्यपालांनी काढलेल्या फतव्याचा निषेध असो, कोडोलीच्या नग्न पुजेच्या विरोधातील आंदोलन असो वा वाशीचे दारुबंदी आंदोलन असो, अथवा राज्य शासनाच्या फलज्योतिष अभ्यासक्रमाला विरोध असो, इतकेच काय हुपरीच्या दलित - सवर्ण दंगलीत जळलेल्या दलितांची घरे पुन्हा सवर्णांकडूनच उभे करुन घेणारे पानसरे प्रत्येक ठिकाणी आपली निश्चित भुमिका घेवून उभे राहिले. पानसरेंच्या आयुष्यात शोषित, कष्टकरी, गरीब, आणि नाही रे, वर्गातील लोकांसाठी त्यांनी केलेल्या शेकडो आंदोलनांचा परामर्ष जागेच्या मर्यादेमुळे घेता येत नसला तरी त्यांच्या दोन आंदोलनांचा उल्लेख अवश्य केला पाहिजे.

"मी नथूराम गोडसे" या नाटाकावर कोल्हापूरात आयोजित परिसंवादाला जेव्हा जिल्हा प्रशासनाने संयोजकांवर दबाव आणून बंदी घातली तेव्हा शाहू स्मारकाच्या दारात दोनशे कार्यकर्त्यांसमवेत पानसरे यांनी त्याच ठिकाणी "कॉरिडॉर" मध्ये परिसंवाद घेऊन घटनेतील आपल्या स्वातंत्र्याची जाणीव प्रशासनाला करुन दिली. केशवराव भोसले नाटयगृहात पत्नी समवेत "यदा कदाचित" या नाटकाचा खेळ पाहत असताना हिंदुत्ववाद्यांनी गोंधळ करुन नाटक बंद पाडण्याचा प्रयत्न केला तेंव्हा जिवाची पर्वा न करता तडक रंगमंचावर जावून आव्हान देऊन त्यांनी या नाटकातील विघ्न दूर केले. महाराष्ट्राच्या विधानसभेत मोलकर्णीसाठी संमत झालेल्या कायद्याचे शिल्पकारही कॉ.पानसरे हेच होते. त्यांनी लिहिलेले "शिवाजी कोण होता " हे पुस्तक, त्यांनी स्थापन केलेलेली "श्रमिक प्रतिष्ठान" व "आम्ही भारतीय लोक आंदोलन" ही दोन व्यासपीठे त्यांच्या कार्यप्रवासातील मैदाचा दगड ठरली. त्यांनी स्थापन केलेल्या श्रमिक प्रतिष्ठानमुळे कोल्हापूरच्या सार्वजनिक जीवनात पुरोगामी सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळीसाठी एक भक्कम व्यासपीठ उपलब्ध झाले.

"आम्ही भारतीय लोक आंदोलना" मुळे कोल्हापूरात जातीय सलोख्याला कधी गालबोट लागलेले नाही म्हणूनच १९९२ मध्ये बाबरी मशिद कोसळल्यानंतर संपूर्ण देश जातीय वणव्यात होरपळून निघत असतांना ती झळ कोल्हापूरात प्रवेश करु शकली नाही. माणूस आपले दुःख किती गिळू शकतो आणि गिळता गिळता आपण स्विकारलेल्या तत्वज्ञानाला पुढे नेण्याचा प्रयत्न कसा करतो याचे दर्शन कॉ.पानसरे यानी आपल्या एकुलत्या एक मुलांच्या निधनावेळी कोल्हापूरकरांना घडविले.

कॉ.अविनाश पानसरे या पित्याप्रमाणे लढाऊ बाणा असलेल्या युवा नेत्याचे अकाली निधन झाल्यानंतर कोल्हापुरातील डावी पुरागामी चळवळच हादरुन गेली. हजारोंच्या उपस्थितीत अविनाशची अंत्ययात्रा बिंदू चौकातील "रेड फलॅग बिल्डींग" जवळ आली, तेव्हा सर्वत्र शांतता पसरली होती. कोणाला काय करायचे हेच कळत नव्हते. अशा वेळी पुत्र वियोगाने मुळापासून हादरलेले गोविंदराव पानसरे पार्थिव असलेल्या गाडीवर चढले आणि पक्षाचा झेंडा अविनाशच्या पार्थिवावर अंथरुन त्यांनी आपली मूठ आवळली, 'अविनाश पानसरे लाल सलाम', 'अविनाश का अधूरा काम कौन करेगा ? हम करेंगे, हम करेंगे, अशी पानसरेंची घोषणा आसमंतात घुमली तेव्हा उपस्थितांच्या हृदयाला पाझर फुटल्यावाचून राहिला नाही. स्वतःच्या डोळयातील अश्रू लपवून कार्यकर्त्यांना आधार देणा-या पानसरेंचा धीरोदत्तपणाही कोल्हापूरकरांनी तेव्हा अनुभवला आणि तत्वज्ञानाशी असलेल्या आणि त्यांच्या प्रामाणिकपणाचे अनोखे दर्शनही घेतले.

**कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांचा जीवनपट पुढीलप्रमाणे.**

| | |
|---|---|
| नांव | कॉ.गोविंद पंढरीनाथ पानसरे. |
| जन्म/ ठिकाण | २६ नोव्हेंबर १९३३, कोल्हापूर (ता.श्रीरामपूर जि.अहमदनगर) |
| शिक्षण | बी.ए. (ऑनर्स), एल.एल.बी.,<br>प्राथमिक शिक्षण - जन्मगावी कोल्हापूर येथे.<br>माध्यमिक शिक्षण - राहूरी जि.अहमदनगर.<br>महाविद्यालयीन शिक्षण - राजाराम कॉलेज, कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर प्रिन्स शिवाजी बोर्डीगमध्ये शिक्षण घेतले. |
| व्यवसाय | कोल्हापूरात वृत्तपत्र विक्रेता म्हणून काही वर्षे काम केले. म्युनिसिपालिटीत शिपाई म्हणून नोकरी व म्युनिसिपल स्कुल बोर्डात काही काळ प्राथमिक शिक्षक म्हणन काम, तदनंतर १९६४ पासून वकीली.<br>कोल्हापूर डिस्ट्रीक्ट बार असासिएशनचे अनेकवर्षे अध्यक्ष. शिवाजी सहयोगी व्याख्याता म्हणून १० वर्षे काम. |

**लिखाण.**

१ शिवाजी कोण होता ? (१९८४) (एकूण चोवीस आवृत्या) कानडी, उर्दू, गुजराती, इंग्रजी, हिंदी भाषेत प्रसिध्द.
२ मंडल आयोग आणि राखीव जागांचा प्रश्न (१९८३) (चार आवृत्या)
३ अजून न स्वीकारलेला मंडल आयोग (१९९७) (दोन आवृत्या)
४ मंडल आयोग आणि मागासलेले मुस्लीम (१९९८)
५ काही कामगार कायद्यांची तोंड ओळख (१९९२) (चार आवृत्या)
६ ३७० कलमाची कुळकथा (१९९४)
७ मुस्लिमांचे लाड (१९९४)
८ पंचायत राज्याचा राजीनामा.
९ अवमुल्यन - कळ सोसायची कुणी ?
१० राजर्षी शाहू - वसा आणि वारसा (तीन आवृत्या)
११ शेती धोरण परधार्जिणे (तीन आवृत्या)
१२ कामगारविरोधी कामगार धोरणे (तीन आवृत्या)

**पुरस्कार.**

(१) भीमक्रांती पुरस्कार. (२) सामाजिक कार्यासाठी भाई माधवराव बागल पुरस्कार,
(३) कोल्हापूर भूषण पुरस्कार.

कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांच्या मृत्यूने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. आयुष्यभर विवेकाने विचारांची लढाई लढणारे लढवय्ये काळाच्या पडद्याआड गेल्याने पुरोगामी चळवळीचे मोठया नुकसान झाले आहे. कॉ. गोविदराव पानसरे यांच्या निधनाने डाव्या चळवळीतील भीष्माचार्य हरपले असून त्यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र नव्हे तर संपूर्ण भारतदेशात शोककळा पसरली आहे. कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांचे आत्म्यास चिरशांती लाभो याकरितां आम्ही ईश्वरचरणी प्रार्थना करीत असून त्यांच्या कुटूंबास हे दु:ख सहन करण्याची ईश्वर त्यांना ताकद देवो अशी आम्ही प्रार्थना करीत आहोत. सदर दु:खवटा ठराव आगामी सर्वसाधारण सभेत घेऊन त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करावी, ही विनंती.

सही/- सही /-
सुचक :- श्री. नरेश म्हस्के अनुमोदक :-श्री. हणमंत जगदाळे

महापौर

६ ३७० कलमाची कुळकथा (१९९४)
७ मुस्लिमांचे लाड (१९९४)
८ पंचायत राज्याचा राजीनामा.
९ अवमुल्यन - कळ सोसायची कुणी ?
१० राजषी शाहू - वसा आणि वारसा (तीन आवृत्या)
११ शेती धोरण परधार्जिणे (तीन आवृत्या)
१२ कामगारविरोधी कामगार धोरणे (तीन आवृत्या)

**पुरस्कार.**

(१) भीमक्रांती पुरस्कार.(२) सामाजिक कार्यासाठी भाई माधवराव बागल पुरस्कार,
(३) कोल्हापूर भूषण पुरस्कार.

कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांच्या मृत्यूने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. आयुष्यभर विवेकाने विचारांची लढाई लढणारे लढवय्ये काळाच्या पडद्याआड गेल्याने पुरोगामी चळवळीचे मोठया नुकसान झाले आहे. कॉ. गोविदराव पानसरे यांच्या निधनाने डाव्या चळवळीतील भीष्माचार्य हरपले असून त्यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र नव्हे तर संपूर्ण भारतदेशात शोककळा पसरली आहे. कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांचे आत्म्यास चिरशांती लाभो याकरितां आम्ही ईश्वरचरणी प्रार्थना करीत असून त्यांच्या कुटूंबास हे दु:ख सहन करण्यांची ईश्वर त्यांना ताकद देवो अशी ही सर्वसाधारण सभा प्रार्थना करुन भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सुचक :-श्री. नरेश म्हस्के — अनुमोदक :- श्री. हणमंत जगदाळे

सही/-
(श्री. संजय भाऊराव मोरे )
महापौर,
ठाणे महानगरपालिका ठाणे.

<u>दुखवटा ठराव</u>

**ठाणे महानगपालिका ठराव क्रमांक २५७ दिनांक २५/०२/२०१५**

**ठ रा व :-**

ठाणे महानगरपालिकेचे माजी सन्मा. नगरसवेक श्री. प्रकाश हरिश्चंद्र राऊत यांचे शनिवार दि. २१ फेब्रुवारी २०१५ रोजी सकाळी ११.३० वा. हृदयविकाराच्या झटक्याने दु:खद निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले, मुली, स्नुषा, नातवंडे व जावई असा परिवार आहे.

कै. प्रकाश हरिश्चंद्र राऊत हे ठाणे नगरपरिषदेच्या १९७४ साली झालेल्या निवडणूकीत प्रथमच शिवसेनेचे नगरसेवक म्हणून वॉर्ड क्र. ५९ मधून निवडून आले होते.

त्यानंतर सतत नगरसेवक असलेले कै.प्रकाश हरिश्चंद्र राऊत ठाणे महानगरपालिकेच्या १९८६ सालच्या निवडणूकीत प्रथम नगरसेवक म्हणून निवडून आले. १९८८ सालच्या महापौर पदाच्या निवडणूकीत ते शिवसेना पक्षातर्फे महापौर पदासाठी उमेदवार होते. परंतू ते एका मताच्या फरकामुळे निवडून येऊ शकले नाहीत. २००७ सालच्या महापालिकेच्या निवडणूकीत ते परत एकदा नगरसेवक म्हणून निवडून आले.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

१९७४ ते १९८१ नगरपरिषदेचे नगरसेवक. १९८६ ते २०१२ महानगरपालिकेचे नगरसेवक तसेच महानगरपालिकेत आरोग्य समिती सभापती, स्थायी समिती सदस्य म्हणून त्यांनी कार्य केले आहे.

शिवसेना पक्षाच्या प्रत्येक कार्यक्रमात, तसेच ठाणे पूर्वेच्या विकासात त्यांचा सिंहाचा वाटा होता.

कै. प्रकाश हरिश्चंद्र राऊन यांचे निधनामुळे त्यांच्या कुटूंबियांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे हे दु:ख सहन करण्याची ताकद परमेश्वर त्यांच्या कुटूंबियांस देवो व त्यांच्या आत्म्यास शांती लाभो अशी परमेश्वर चारणी प्रार्थना करुन त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सुचक :-श्री. नरेश म्हस्के

अनुमोदक :- श्री. हणमंत जगदाळे

सही/-
(श्री. संजय भाऊराव मोरे )
महापौर,
ठाणे महानगरपालिका ठाणे.

**(तद्नंतर श्रध्दांजली अर्पण करुन मा.महापौर महोदय, दुपारी १२.५५ वाजता सभा पूर्णवेळ तहकूब करतात.)**

**(मनिष जोशी )**
**महापालिका सचिव,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**सभा तहकूब केल्याची वेळ दुपारी १२.५५ वा.**
**महापालिका सचिव कार्यालय,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**
**दिनांक :- २५/०२//२०१५**

**सही/-**
**(श्री. संजय भाऊराव मोरे)**
**महापौर,**
**ठाणे महाागरपालिका, ठाणे.**

दि १७-६-२०१५ रोजीच्या मा. सर्वसाधारण सभेत सदरचे इतिवृत्त वाचून कायम करणेत आले

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

६ ३७० कलमाची कुळकथा (१९९४)
७ मुस्लिमांचे लाड (१९९४)
८ पंचायत राज्याचा राजीनामा.
९ अवमुल्यन - कळ सोसायची कुणी ?
१० राजर्षी शाहू - वसा आणि वारसा (तीन आवृत्या)
११ शेती धोरण परधार्जिणे (तीन आवृत्या)
१२ कामगारविरोधी कामगार धोरणे (तीन आवृत्या)

**पुरस्कार.**

(१) भीमक्रांती पुरस्कार.(२) सामाजिक कार्यासाठी भाई माधवराव बागल पुरस्कार,
(३) कोल्हापूर भूषण पुरस्कार.

कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांच्या मृत्यूने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. आयुष्यभर विवेकाने विचारांची लढाई लढणारे लढवय्ये काळाच्या पडद्याआड गेल्याने पुरोगामी चळवळीचे मोठया नुकसान झाले आहे. कॉ. गोविदराव पानसरे यांच्या निधनाने डाव्या चळवळीतील भीष्माचार्य हरपले असून त्यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र नव्हे तर संपूर्ण भारतदेशात शोककळा पसरली आहे. कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांचे आत्म्यास चिरशांती लाभो याकरितां आम्ही ईश्वरचरणी प्रार्थना करीत असून त्यांच्या कुटूंबास हे दुःख सहन करण्यांची ईश्वर त्यांना ताकद देवो अशी ही सर्वसाधारण सभा प्रार्थना करुन भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सुचक :-श्री. नरेश म्हस्के

अनुमोदक :- श्री. हणमंत जगदाळे

सही/-
(श्री. संजय भाऊराव मोरे )
महापौर,
ठाणे महानगरपालिका ठाणे.

**दुखवटा ठराव**

**ठाणे महानगपालिका ठराव क्रमांक २५७ दिनांक २५/०२/२०१५**

**ठ रा व :-**

ठाणे महानगरपालिकेचे माजी सन्मा. नगरसवेक श्री. प्रकाश हरिश्चंद्र राऊत यांचे शनिवार दि. २१ फेब्रुवारी २०१५ रोजी सकाळी ११.३० वा. हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले, मुली, स्नुषा, नातवंडे व जावई असा परिवार आहे.

कै. प्रकाश हरिश्चंद्र राऊत हे ठाणे नगरपरिषदेच्या १९७४ साली झालेल्या निवडणूकीत प्रथमच शिवसेनेचे नगरसेवक म्हणून वॉर्ड क्र. ५९ मधून निवडून आले होते.

त्यानंतर सतत नगरसेवक असलेले कै.प्रकाश हरिश्चंद्र राऊत ठाणे महानगरपालिकेच्या १९८६ सालच्या निवडणूकीत प्रथम नगरसेवक म्हणून निवडून आले. १९८८ सालच्या महापौर पदाच्या निवडणूकीत ते शिवसेना पक्षातर्फे महापौर पदासाठी उमेदवार होते. परंतू ते एका मताच्या फरकामुळे निवडून येऊ शकले नाहीत. २००७ सालच्या महापालिकेच्या निवडणूकीत ते परत एकदा नगरसेवक म्हणून निवडून आले.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

१९७४ ते १९८१ नगरपरिषदेचे नगरसेवक. १९८६ ते २०१२ महानगरपालिकेचे नगरसेवक तसेच महानगरपालिकेत आरोग्य समिती सभापती, स्थायी समिती सदस्य म्हणून त्यांनी कार्य केले आहे.

शिवसेना पक्षाच्या प्रत्येक कार्यक्रमात, तसेच ठाणे पूर्वेच्या विकासात त्यांचा सिंहाचा वाटा होता.
कै. प्रकाश हरिश्चंद्र राऊन यांचे निधनामुळे त्यांच्या कुटूंबियांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे हे दु:ख सहन करण्याची ताकद परमेश्वर त्यांच्या कुटूंबियांस देवो व त्यांच्या आत्म्यास शांती लाभो अशी परमेश्वर चारणी प्रार्थना करुन त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सुचक :-श्री. नरेश म्हस्के

अनुमोदक :- श्री. हणमंत जगदाळे

सही/-
(श्री. संजय भाऊराव मोरे )
महापौर,
ठाणे महानगरपालिका ठाणे.

**(तद्नंतर श्रध्दांजली अर्पण करुन मा.महापौर महोदय, दुपारी १२.५५ वाजता सभा पूर्णवेळ तहकूब करतात.)**

**(मनिष जोशी )**
**महापालिका सचिव,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**सभा तहकूब केल्याची वेळ दुपारी १२.५५ वा.**
**महापालिका सचिव कार्यालय,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**
**दिनांक :- २५/०२//२०१५**

**सही/-**
**(श्री. संजय भाऊराव मोरे)**
**महापौर,**
**ठाणे महाागरपालिका, ठाणे.**

दि १७-६-२०१५ रोजीच्या मा. सर्वसाधारण सभेत सदरचे इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

६ ३७० कलमाची कुळकथा (१९९४)
७ मुस्लिमांचे लाड (१९९४)
८ पंचायत राज्याचा राजीनामा.
९ अवमुल्यन - कळ सोसायची कुणी ?
१० राजषी शाहू - वसा आणि वारसा (तीन आवृत्या)
११ शेती धोरण परधार्जिणे (तीन आवृत्या)
१२ कामगारविरोधी कामगार धोरणे (तीन आवृत्या)

**पुरस्कार.**

(१) भीमक्रांती पुरस्कार.(२) सामाजिक कार्यासाठी भाई माधवराव बागल पुरस्कार,
(३) कोल्हापूर भूषण पुरस्कार.

कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांच्या मृत्यूने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. आयुष्यभर विवेकाने विचारांची लढाई लढणारे लढवय्ये काळाच्या पडद्याआड गेल्याने पुरोगामी चळवळीचे मोठया नुकसान झाले आहे. कॉ. गोविदराव पानसरे यांच्या निधनाने डाव्या चळवळीतील भीष्माचार्य हरपले असून त्यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र नव्हे तर संपूर्ण भारतदेशात शोककळा पसरली आहे. कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांचे आत्म्यास चिरशांती लाभो याकरितां आम्ही ईश्वरचरणी प्रार्थना करीत असून त्यांच्या कुटूंबास हे दुःख सहन करण्यांची ईश्वर त्यांना ताकद देवो अशी ही सर्वसाधारण सभा प्रार्थना करुन भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सुचक :-श्री. नरेश म्हस्के

अनुमोदक :- श्री. हणमंत जगदाळे

सही/-
(श्री. संजय भाऊराव मोरे )
महापौर,
ठाणे महानगरपालिका ठाणे.

**दुखवटा ठराव**

**ठाणे महानगपालिका ठराव क्रमांक २५७ दिनांक २५/०२/२०१५**

**ठ रा व :-**

ठाणे महानगरपालिकेचे माजी सन्मा. नगरसवेक श्री. प्रकाश हरिश्चंद्र राऊत यांचे शनिवार दि. २१ फेब्रुवारी २०१५ रोजी सकाळी ११.३० वा. हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले, मुली, स्नुषा, नातवंडे व जावई असा परिवार आहे.

कै. प्रकाश हरिश्चंद्र राऊत हे ठाणे नगरपरिषदेच्या १९७४ साली झालेल्या निवडणूकीत प्रथमच शिवसेनेचे नगरसेवक म्हणून वॉर्ड क्र. ५९ मधून निवडून आले होते.

त्यानंतर सतत नगरसेवक असलेले कै.प्रकाश हरिश्चंद्र राऊत ठाणे महानगरपालिकेच्या १९८६ सालच्या निवडणूकीत प्रथम नगरसेवक म्हणून निवडून आले. १९८८ सालच्या महापौर पदाच्या निवडणूकीत ते शिवसेना पक्षातर्फे महापौर पदासाठी उमेदवार होते. परंतू ते एका मताच्या फरकामुळे निवडून येऊ शकले नाहीत. २००७ सालच्या महापालिकेच्या निवडणूकीत ते परत एकदा नगरसेवक म्हणून निवडून आले.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

१९७४ ते १९८१ नगरपरिषदेचे नगरसेवक. १९८६ ते २०१२ महानगरपालिकेचे नगरसेवक तसेच महानगरपालिकेत आरोग्य समिती सभापती, स्थायी समिती सदस्य म्हणून त्यांनी कार्य केले आहे.

शिवसेना पक्षाच्या प्रत्येक कार्यक्रमात, तसेच ठाणे पूर्वेच्या विकासात त्यांचा सिंहाचा वाटा होता.
कै. प्रकाश हरिश्चंद्र राऊन यांचे निधनामुळे त्यांच्या कुटूंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे हे दुःख सहन करण्याची ताकद परमेश्वर त्यांच्या कुटूंबियांस देवो व त्यांच्या आत्म्यास शांती लाभो अशी परमेश्वर चारणी प्रार्थना करुन त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सुचक :-श्री. नरेश म्हस्के

अनुमोदक :- श्री. हणमंत जगदाळे

सही/-
(श्री. संजय भाऊराव मोरे )
महापौर,
ठाणे महानगरपालिका ठाणे.

**(तद्नंतर श्रध्दांजली अर्पण करुन मा.महापौर महोदय, दुपारी १२.५५ वाजता सभा पूर्णवेळ तहकूब करतात.)**

**(मनिष जोशी )**
**महापालिका सचिव,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**सभा तहकूब केल्याची वेळ दुपारी १२.५५ वा.**
**महापालिका सचिव कार्यालय,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**
**दिनांक :- २५/०२//२०१५**

**सही/-**
**(श्री. संजय भाऊराव मोरे)**
**महापौर,**
**ठाणे महाागरपालिका, ठाणे.**

दि० १७-६-२०१५ रोजीच्या मा. सर्वसाधारण सभेत सदरचे इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे